# जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर
# खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
# नोंदनी क्रमांक – ई-3342/2017 दिनांक 27/11/2017

**आदेश क्र. जिखप्र/प्रमा - शिक्षण/469/2026**

**दिनांक : 09-03-2026**

## प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश

**विषय -** प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत "शिक्षण" या शिर्षकाखाली मौदा तालुक्यातील तालुका क्रिडा संकुल मौदा येथे बॅडमिंटन हॉल करीता अतिरिक्त निधी उपलब्ध करून देणे या कामाला प्रशासकीय मान्यता व निधी वितरण.

**वाचा -**
1. भारत सरकार खाण मंत्रालय प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY) यांचे सुधारीत मार्गदर्शक सूचना दिनांक 15/01/2024
2. महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांचे शासन निर्णय क्र. डीएमएफ-0124/ प्र.क्र. 10/उद्योग-9 मंत्रालय, मुंबई-32, दि. 11 ऑक्टोबर 2024
3. मा.ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री महसुल, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, तालुका क्रीडा संकुल समिती, मौदा ता. मौदा नागपूर यांनी दिनांक 06/01/2025 रोजी दिलेल्या निर्देशान्वये
4. क्रिडा अधिकारी तथा सदस्य सचिव, तालुका क्रीडा संकुल समिती, मौदा यांचे दिनांक 27/03/2025 रोजीच्या पत्रान्वये
5. जिल्हा क्रिडा अधिकारी, नागपूर यांचे जा.क्र. जिक्रीअ/जिखप्र/ताक्रीस/मौदा/निमा/2025-26/905 दिनांक 05/06/2025
6. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर यांचे पत्र क्र. का. इमा-2/तां.मा./2892/2024 दिनांक 19/03/2024
7. मा. जिल्हाधिकारी महोदय यांचे दिनांक 13 / 03 /2026 रोजीच्या मंजुर टिपणीनूसार

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 3 नूसार मा.ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री महसुल, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, तालुका क्रीडा संकुल समिती, मौदा ता. मौदा नागपूर यांनी बॅडमिंटन हॉल करीता अतिरिक्त निधी रू. 2,50,00,000/- (अक्षरी- रू. दोन कोटी पन्नास लक्ष फक्त) जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर या कार्यालयाकडून उभा करण्याच्या दृष्टिने या कार्यालयास निधी मागणी प्रस्ताव सादर करण्याबाबतचे क्रिडा अधिकारी तथा सदस्य सचिव, तालुका क्रीडा संकुल समिती, मौदा यांना निर्देश दिलेले होते. त्यानुषंगाने, क्रिडा अधिकारी तथा सदस्य सचिव, तालुका क्रीडा संकुल समिती, मौदा यांनी उपरोक्त बांधकामाकरीता जिल्हा खनिज प्रतिष्ठान नागपूर या कार्यालयाकडून अतिरिक्त निधी उपलब्ध करून मिळणेबाबत जिल्हा क्रिडा अधिकारी, नागपूर यांना संदर्भिय पत्र क्र. 4 नूसार विनंती केलेली आहे. यानूसार जिल्हा क्रिडा अधिकारी, नागपूर यांनी संदर्भिय पत्र क्र. 5 नूसार प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत "शिक्षण" या शिर्षकाखाली मौदा तालुक्यातील तालुका क्रिडा संकुल मौदा येथे बॅडमिंटन हॉल करीता अतिरिक्त निधी रू. 2,50,00,000/- (अक्षरी- रू. दोन कोटी पन्नास लक्ष फक्त) उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे. तसेच, संदर्भ क्र. 6 चे पत्रान्वये तालुका क्रीडा संकुल मौदा तालुका मौदा जिल्हा नागपूर येथील बॅडमिंटन हॉल बांधकाम करणे या कामाचे एकुण रु.529.37 लक्ष एवढया अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभाग, विशेष प्रकल्प, नागपूर यांचे विभागामार्फत दिनांक 19/03/2024 रोजी तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली आहे. संदर्भ क्र. 7 च्या टिपणीनुसार मा. जिल्हाधिकारी महोदयांनी सदर प्रस्तावास मंजूरी प्रदान केलेली आहे.

## नियोजित कामांचे विवरण

| अ.क्र | तालुका | मौजा | कार्यान्वित यंत्रणा | कामाचे नाव | प्रशासकीय मान्यता रक्कम | या आदेशान्वये वितरीत 20% निधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मौदा | मौदा | जिल्हा क्रिडा अधिकारी, नागपूर | तालुका क्रीडा संकुल मौदा तालुका मौदा जिल्हा नागपूर येथील बॅडमिंटन हॉल बांधकाम करणे या कामाला अतिरिक्त निधी उपलब्ध करून देणे | 25000000 | 5000000 | अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र (उच्च प्राथम्य बाबी) |
| एकुण | | | | | 25000000 | 5000000 | |
| | | | | | | | (अक्षरी- रू पन्नास लक्ष फक्त) |

